**नियमित दिवाणी दावा क्र.४६/२०१५**
**कारभारी प्रधान वि. आशाबाई प्रधान व इतर**

## <u>नि.क्र.१३८ खाली आदेश</u>

(दिनांक ३१/०७/२०२५)

१. प्रस्तुत अर्ज वादी हिने नि.५५ अन्वये पारीत करण्यात आलेला जैसे थे स्थिती बाबतचा आदेश प्रस्तुत दाव्याच्या निकालापर्यंत कायम करण्यात यावा या करिता दिलेला आहे.

२. वादीची विनंती थोडक्यात खालील प्रमाणे-

नि. ५५ अन्वये पारीत करण्यात आलेला आदेश आजपर्यंत कायम आहे. तथापि प्रतिवादी यांनी जैसे थे स्थिती आदेशाचा भंग करुन दाव मिळकतीमध्ये टीन शेड उभारले आहे. त्यामुळे नि. ५५ अन्वयेचा आदेश प्रस्तुत दाव्याच्या निकालापर्यंत कायम करण्यात यावा येणेप्रमाणे विनंती असे.

३. प्रस्तुत अर्जावर प्रतिवादी यांचेतर्फे विस्तृत लेखी म्हणणे सादर करुन प्रस्तुत अर्ज मंजूर करण्यास जोरदार हरकत घेतली.

४. प्रतिवादी यांचे म्हणणे थोडक्यात खालीलप्रमाणे -

अर्जातील संपूर्ण मजकुर खोटा आहे. अर्जासोबत कोणताही पुरावा व शपथपत्र दिलेले नाही. प्रतिवादी यांनी मा. न्यायालयाचे ''जैसे थे'' आदेशाचे कोणतेही उल्लंघन केलेले नाही व दावा मिळकतीचे स्वरुप बदललेले नाही. अर्जात केलेल्या कथनानुसार कोणताही पुरावा दिलेला नाही. करिता सदरचा अर्ज फेटळण्यात यावा अशी विनंती केली. येणे प्रमाणे म्हणणे असे.

५. वादी व प्रतीवादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. पाटील आणि श्री. दळवी यांना विस्तृतपणे ऐकले. दोन्ही विधीज्ञ यांनी प्रस्तुत दाव्यातील अंतरीम अर्जावरील आदेश प्रतिवादी यांनी मा. उच्च न्यायालय येथे आव्हानित केलेले आहे असे कथन सादर करुन प्रस्तुत दाव्यात पुढील तारिख मिळावी अशी तोंडी विनंती केली. दोन्ही विधीज्ञ यांचे तोंडी कथन, निशाणी ५५ वरील आदेश आजपावेतो कायम असल्याची बाब, मा. उच्च

न्यायालयामध्ये प्रस्तुत दाव्यासंदर्भात याचिका दाखल झाल्याची बाब आणि अधिकची गुंतागुंत काढण्याकरीता प्रस्तुत कामी कायम असलेला "जैसे थे" चा आदेश पुढील तारखेपर्यंत कायम करण्यात येत आहे. दोन्ही पक्षांनी नोंद घ्यावी.

PATIL PRAJAKTA
Digitally signed by PATIL PRAJAKTA
Date: 2025.08.01 17:05:41 +0530

दि.३१/०७/२०२४

श्रीमती पी.बी.पाटील
सह दिवाणी न्यायाधिश, क.स्तर,
न्यायालय क्र.२, गंगापूर